# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:06.01.2026** **वार:मंगळवार**

1. स्वदेशी बनावटीची पहिली प्रदूषण नियंत्रक 'समुद्र प्रताप' नौका भारतीय तटरक्षक दलाच्या ताफ्यात दाखल,
2. सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या पुनर्निर्माणानिमित्त यंदा देशभर 'स्वाभिमान पर्व',
3. राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला जोर; उमेदवारांच्या बिनविरोध निवडीबाबत आरोप-प्रत्यारोप आणि
4. एसटी महामंडळाच्या ताफ्यात या वर्षअखेरपर्यंत आठ हजार नवीन बसगाड्या दाखल करण्याचे परिवहनमंत्र्यांचे निर्देश.

**समुद्र प्रताप**

देशातली पहिली स्वदेशी बनावटीची प्रदूषण नियंत्रक 'समुद्र प्रताप' नौका भारतीय तटरक्षक दलाच्या ताफ्यात काल गोव्यात दाखल झाली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यावेळी उपस्थित होते. ही नौका सागरी प्रदूषण नियंत्रण नियमन, सागरी कायदा अंमलबजावणी, बचाव आणि शोध मोहीम राबवण्यात उपयोगी पडेल. ही नौका देशाचा सामूहिक दृढनिश्चय आणि आत्मविश्वास यांचं प्रतीक असल्याचं संरक्षणमंत्री यावेळी म्हणाले. सागरी जैवविविधतेचं संरक्षण करणं ही नैतिक जबाबदारी आहे, हे जहाज प्रवाळ खडक आणि समुद्री जीवांचं रक्षण करेल, असंही ते म्हणाले. नौदलाच्या ताफ्यात समुद्र प्रताप नौका समाविष्ट झाल्यामुळे भारतीय तटरक्षक दलाची क्षमता वाढणार असून सागरी सुरक्षा, पर्यावरण सरंक्षण आणि स्वदेशीच्या संकल्पनेला चालना मिळणार आहे.

**मोदी सोमनाथ**

'असंख्य आक्रमणाना तोंड देऊनही देशवासीयांच्या भक्कम पाठिंब्यामुळे भारताचा सांस्कृतिक वारसा अबाधित राहिला', असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. गुजरातमध्ये सौराष्ट्रात वेरावळ इथं असलेलं सोमनाथ हे स्थान भारतीय संस्कृतीत वंदनीय असलेल्या बारा ज्योतिर्लिंगामधील आद्य ज्योतिर्लिंग आहे. आक्रमणकर्त्यांनी हे मंदिर उद्ध्वस्त केल्याच्या पहिल्या घटनेला एक हजार वर्ष यंदा पूर्ण होत आहेत, तसंच या मंदिराचा जीर्णोद्धार झाल्याचंही हे पंच्याहत्तरावं वर्ष आहे. त्यानिमित्त पंतप्रधानांनी समाजमाध्यमांवर संदेश आणि एका लेखाद्वारे ही माहिती दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 11 तारखेला सौराष्ट्रातील सोमनाथ या तीर्थक्षेत्री जाणार आहेत. या मंदिराच्या पुनर्निर्मिती बद्दल यंदाचं वर्ष 'स्वाभिमान पर्व' म्हणून साजरं केलं जाणार असून संपूर्ण वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

**सुधारणांचे वर्ष**

2025 या वर्षात व्यवसाय सुलभतेच्या दृष्टीनं अनेक महत्त्वाचे निर्णय केंद्र सरकारनं घेतले. 'सुधारणांचं वर्ष' या मालिकेत आज ऐकूया व्यवसाय सुलभता वाढवण्यासाठी झालेल्या सुधारणांबाबत, माझ्या सहकारी संध्या खान यांच्याकडून....

**उद्योग सुरू करणं, वाढवणं आणि जागतिक स्तरावर नेणं—या सगळ्या प्रक्रियांमधील अडथळे दूर करण्यासाठी 2025 मध्ये केंद्र सरकारनं अनेक निर्णय घेतले. 'लघु कंपनी' ठरण्यासाठीची उलाढाल मर्यादा दहा पटींनी वाढवून 100 कोटी रुपये करण्यात आली. परिणामी, उद्योगांनी वाढ केली तरी त्यांना दंडात्मक चौकटीत अडकावं लागणार नाही, असा विश्वास निर्माण झाला. त्याचबरोबर, गुंतागुंतीचे कामगार कायदे एकत्र करून चार सोप्या आणि समन्वित कामगार संहिता लागू करण्यात आल्या. 'मेक इन इंडिया' मोहिमेला नव्यानं बळ देण्यात आलं. गुणवत्ता नियंत्रण नियमांमध्ये आवश्यक ती लवचिकता आणली गेली, निर्यात वाढीसाठी स्वतंत्र निर्यात प्रोत्साहन मिशन सुरू करण्यात आलं. उद्योगांना केवळ देशांतर्गत नव्हे, तर जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून गेल्या वर्षभरात भारताने; इंग्लंड, ओमान आणि न्यूझीलंड या देशांबरोबर तीन महत्त्वाचे मुक्त व्यापार करार केले. या करारांमुळे भारतीय उत्पादकांसाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची दारं अधिक रुंदावली. सागरी वाहतुकीशी संबंधित जुन्या, कालबाह्य कायद्यांमध्ये सुधारणा करून त्याऐवजी पाच आधुनिक कायदे लागू करण्यात आले. या सर्व धोरणात्मक निर्णयांमुळे, सुधारणा आणि करारांमुळे 2025 या वर्षात भारताच्या उद्योगविश्वासाठी एका नव्या युगाचा प्रारंभ झाला आहे.**

**पत्रकार दिन**

पत्रकार दिनानिमित्त आज राज्यात सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मराठीतील पहिलं 'दर्पण' हे वृत्तपत्र 6 जानेवारी 1832 रोजी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलं. त्यानिमित्त आजचा दिवस मराठी पत्रकार दिन म्हणजेच दर्पण दिन म्हणून साजरा केला जातो.

**निवडणूक-मुंबई-औरंगाबाद**

महानगरपालिका निवडणुकांमध्ये बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकारण तापलं आहे. या निवडणुकीत महायुतीने आपले उमेदवार बिनविरोध निवडून आणल्याचा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी निषेध केला. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

महापालिका निवडणुकीत महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याप्रकरणी मनसेनं मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या निवडणुकांमध्ये 68 ठिकाणी झालेल्या बिनविरोध निवडणुकीला स्थगिती द्यावी आणि मोठ्या प्रमाणात झालेल्या अर्ज माघारीची न्यायालयीन चौकशी करावी असं मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी दाखल केलेल्या याचिकेत म्हटलं आहे.

बिनविरोध निवडणुकांना विरोध करणाऱ्यांनी योग्य व्यासपीठावर न्याय मागावा, असं आवाहन भाजपा नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर विमानतळावर वार्ताहरांशी बोलत होते. बिनविरोध निवडणूक होऊ नये असं कुठल्याही कायद्यात लिहिलेलं नाही, निवडणूक आयोगाची याला परवानगी आहे याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

दरम्यान महानगरपालिका निवडणूकीच्या प्रचाराचा जोर वाढत आहे. मुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी काल परभणी, नांदेड आणि पुण्यात जाहीर सभा घेतल्या.

पुणे देशात सर्वाधिक वेगानं विकसित होणारे शहर आहे; येत्या काळात आम्ही पुण्याचा चेहरा बदलून दाखवू, असा निर्धार फडणवीस यांनी पुण्यातील सभेत व्यक्त केला. उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी काल ठाण्यात रोड शो केला.

सोलापूरमध्ये काल झालेल्या भाजपाच्या कार्यकर्ता मेळाव्यामध्ये प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संवाद साधला.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे मुंबईत पक्ष शाखांना भेट देत आहेत. याशिवाय दादरमध्ये शिवाजी पार्क, ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि नाशिकमध्ये त्यांच्या संयुक्त प्रचारसभा होणार आहेत.

**सरनाईक-मुंबई**

'एसटी, अर्थात राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात आठ हजार नवीन बसगाड्या या वर्षअखेरपर्यंत दाखल करा, त्यासाठी सध्या सुरू असलेली निविदा प्रक्रिया तातडीनं गतिमान करा', अशा सूचना परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिल्या आहेत. एसटी महामंडळाच्या 2025-26 च्या अर्थसंकल्पीय निधीच्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. यंदाच्या अर्थसंकल्पात एसटीसाठी शासनानं 2 हजार 460 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र आर्थिक वर्ष संपायला अवघे तीन महिने शिल्लक असताना त्यापैकी सुमारे 1 हजार 600 कोटी रुपये खर्चाविना परत जाण्याची स्थिती निर्माण झाल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. उरलेल्या तीन महिन्यांत जास्तीत जास्त निधी वापरून करून नवीन बस, बसस्थानकं, प्रसाधनगृहं आदींच्या निर्मितीसाठी आवश्यक निविदा आणि प्रशासकीय प्रक्रिया तातडीनं पूर्ण कराव्यात, आणि प्रकल्पांना गती द्यावी, असे निर्देश सरनाईक यांनी दिले.

**भागीदारी-मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षी पार पडलेल्या वेव्ज परिषदेत संगीत आणि कला क्षेत्रातल्या अनेक नवीन आंतरराष्ट्रीय प्रकल्पांची बीजं रोवली गेली होती, त्याचा परिणाम म्हणून संगीत क्षेत्रातला जागतिक पातळीवरचा पहिला करार मुंबईत होत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. युनिव्हर्सल म्युझिक ग्रुप आणि एक्सेल एंटरटेनमेंट यांच्यामध्ये काल मुंबईत धोरणात्मक भागीदारी कराराची घोषणा करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. हा संगीत क्षेत्रातला जागतिक पातळीवरचा पहिला करार असून, कलाक्षेत्रात आपला ठसा उमटवण्याची इच्छा असलेल्या जगभरातल्या सर्व निर्मात्यांचं महाराष्ट्रात आणि मुंबईत स्वागत असल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले.

**पदवीप्रदान-औरंगाबाद**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा 66 वा दीक्षांत समारंभ काल कुलगुरू डॉक्टर विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून पुणे इथल्या 'आयसर' राष्ट्रीय संस्थेचे संचालक डॉक्टर सुनील भागवत

उपस्थित होते. 'शिक्षण, संशोधनातून आपल्यात निर्माण झालेल्या क्षमतेचा वापर समाजासाठी आणि मानवतेसाठी करा, असं आवाहन भागवत यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केलं.

**तारांगण-बीड**

बीड शहरात तारांगण आणि विज्ञान केंद्र उभारण्याला प्रशासकीय मान्यता मिळाल्याची माहिती आमदार विजयसिंह पंडित यांनी दिली. विज्ञान केंद्रांमध्ये चार माहिती केंद्र असतील तर तारांगणामधे विविध ग्रह, तारे, उल्का, आकाशगंगा आदींची माहिती दिली जाणार आहे. 28 कोटी रुपये खर्चाचं हे तारांगण आणि विज्ञान केंद्र उभारण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली होती.

**नारायण राणे**

'वाशिष्ठी डेअरीच्या माध्यमातून कोकणात सहकारी तत्त्वावर पशुधन-दुग्धव्यवसाय क्षेत्रात चांगली कामगिरी केली जात आहे. या संस्थेतर्फे चिपळूण मध्ये गेली सलग तीन वर्षं भरवलं जाणारं भव्य कृषी प्रदर्शन उल्लेखनीय आहे,' असं प्रतिपादन खासदार नारायण राणे यांनी काल केलं. वाशिष्ठी डेअरीतर्फे भरवण्यात आलेलं कृषी प्रदर्शन आणि कृषी महोत्सवाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं. त्या वेळी ते बोलत होते.

**खेलो इंडिया**

दीवमध्ये कालपासून दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया बीच स्पर्धा सुरू झाल्या आहेत. कालचा उद्‌घाटनाचा दिवस महाराष्ट्राच्या् कबड्डी संघाच्याच धडाकेबाज कामगिरीने गाजला. महिलांनी सलामीच्या लढतीत यजमान दीव-दमण संघाचा 53 गुणांनी धुव्वा उडविला. पाठोपाठ पुरूष संघानेही बलाढ्य दिल्लींला 47-20 गुणांनी पराभूत करीत विजयी सलामी दिली. स्पंर्धेत महाराष्ट्राचं 77 जणांचं पथक सहभागी झालं आहे. यामध्ये 31 पुरूष आणि 28 महिला खेळाडूंचा समावेश आहे. स्पकर्धेत सॉकर, कबड्डी, पेंचक सिलट, जलतरण, सपक टकरा प्रकारात महाराष्ट्र झुंजणार आहे.

**हवामान**

राज्यात सर्वत्र काल किमान तापमान सरासरीच्या जवळपास होतं, येत्या 24 तासात संपूर्ण राज्यात कोरडं हवामान राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.